| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MHJN040018512023 | दाखल दिनांक | : | २४ | ०७ | २०२३ |
| | नोंदणी दिनांक | : | २४ | ०७ | २०२३ |
| | निकाल दिनांक | : | ०२ | ०४ | २०२६ |
| | कालावधी | : | २ व. | ८ म. | ९ दि. |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.१, अंबड यांचे न्यायालयात**
(पिठासीन न्यायाधीश – एस.एस. जैन )

**नि. फौ. ख. क्र. ३६२/२०२३** **निशाणी क्र.२१**

(प्रथम खबर अहवाल क्रमांक – ८१/२०२३)
(अपराध कलम – भा.दं.वी चे कलम ३७९ तसेच, गौण खनिज कायद्याचे कलम ३ व ४ प्रमाणे शिक्षेस पात्र, पोलीस ठाणे – गोंदी)

महाराष्ट्र शासन मार्फत
पोलीस ठाणे, गोंदी
ता.अंबड, जि. जालना. ... **अभियोग पक्ष**

**श्री. बी. ई. निकम सरकारी अभियोक्ता.**

**– विरुध्द –**

लक्ष्मण भाउसाहेब राखुंडे,
वय–२५ वर्षे, धंदा–शेती
रा. सुखापूरी, ता. अंबड, जि. जालना ... **आरोपी**

**श्री. आर. डी. पावसे आरोपीचे विधीज्ञ**

| | |
|---|---|
| अपराध दिनांक | २०.०२.२०२२ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २०.०३.२०२२ |
| दोषारोपपत्र दिनांक | २४.०७.२०२३ |
| दोषारोप ठेवल्याची दिनांक | २४.११.२०२३ |
| पुरावा आरंभ झाल्याची दिनांक | २४.०१.२०२४ |
| न्यायनिर्णयाची राखीव दिनांक | –– |
| न्यायनिर्णय दिनांक | ०२.०४.२०२६ |
| शिक्षा लादलेली असल्यास दिनांक | निरंक. |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष किंवा दोषी | लादलेली शिक्षा | कलम ४२८ फौ.प्र.सं. च्या उद्देशाने खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | लक्ष्मण भाउसाहेब राखुंडे | ०४.०३.२०२३ | ०४.०३.२०२३ | भा.दं.वी चे कलम ३७९ व गौ.ख. का. कलम ३ व ४ प्रमाणे. | निर्दोष | निरंक | --- |

### अ. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी :-

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र.-१ | मदन अर्जूनराव राखुंडे (नि.क्र.११) | पंच साक्षीदार |
| सा.क्र.-२ | सुरेश बळीराम राठोड (नि.क्र.१३) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |

### ब. आरोपीच्या साक्षीदारांची यादी :-

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| - | - | - |

### क. न्यायालयीन साक्षीदार :-

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| - | - | - |

## निशाणी क्रमांकाची यादी :-

### अ. अभियोगपक्ष :

| अ.क्र. | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| -- | -- | -- |

### ब. बचावपक्ष :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## क. न्यायालयीन निशाणी :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | ९ | दोषारोप |
| २ | १० | आरोपीचे निवेदन |
| ३ | २० | आरोपीचे फौ.प्र.सं. क.३१३ अन्वयेचे निवेदन |

## ड. मुद्देमाल :

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | एम. आर. क्र.३५/२०२३ | न्यू हॉलंड कंपनीचे ट्रॅक्टर व विनाक्रमांकाची ट्रॉली |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०२.०४.२०२६)

प्रस्तुतचा फौजदारी खटला हा आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे शिक्षापात्र कलम ३७९ व गौण खनिज कायद्याचे कलम ३ व ४ अंतर्गत दाखल करण्यात आलेला आहे.

**अभियोग पक्षाचे संक्षिप्त कथन येणेप्रमाणे आहे.**

२. फिर्यादी अविनाश अशोक पगारे यांनी पोलीस स्टेशन गोंदी येथे फिर्याद दिली की, दि. २०/०२/२०२३ रोजी सकाळी ६.०० वाजता ते पोलीस वसाहत गोंदी येथे कार्यरत असतांना सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री सानप यांनी दूरध्वनीद्वारे त्यांना माहिती दिली की मौजे रेवलगाव येथून एक विनाक्रमांकाचे ट्रॅक्टर वाळूसह सुखापुरीकडे येत आहे. सदर माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री सानप, पोलीस नाईक १४५९ गायकवाड व पोलीस कॉस्टेबल राठोड यांच्यासह ते खाजगी वाहनाने सुखापुरी येथे सकाळी सुमारे ६.४५ वाजता पोहोचले. तेथे एक निळ्या रंगाचे विनाक्रमांकाचे ट्रॅक्टर ट्रॉलीसह दिसून आले. पोलिसांना पाहताच चालकाने ट्रॉलीतील वाळू जागेवर खाली टाकून पळण्याचा प्रयत्न केला. परंतू, त्यांनी त्यांचा पाठलाग करून ट्रॅक्टर थांबवले व विचारपूस केली असता चालकाने त्याचे नाव लक्ष्मण भाऊसाहेब राखुंडे असे सांगितले. तपासणीदरम्यान एक न्यु हॉलंड कंपनीचे ४५१० मॉडेलचे निळ्या रंगाचे विनाक्रमांकाचे ट्रॅक्टर व एक फिकट लाल रंगाची विनाक्रमांकाची ट्रॉली ज्यामध्ये पाच टोपले वाळू आढळून आली. चालकाकडे वाळू

वाहतुकीसाठी कोणतीही रॉयल्टी किंवा परवाना नसल्याचे आढळले त्यामुळे सदर ट्रॅक्टर, ट्रॉली व वाळू पोलिसांनी जप्त करून पोलीस वसाहत गोंदी येथे आणून ठेवले. अशा आशयाची फिर्याद त्यांनी पोलीस ठाणे गोंदी येथे नोंदवली.

३. सदर फिर्यादीची दखल घेऊन पोलीस ठाणे अंमलदार, गोंदी यांनी आरोपी विरुध्द भारतीय दंड विधान शिक्षापात्र कलम ३७९ व गौण खनिज कायद्याचे कलम ३ व ४ प्रमाणे अपराध क्र.८१/२०२३ अन्वये गुन्हयाची नोंद केली. सदर गुन्हयाचा तपास तपासी अमलदार पोलीस नाईक एम.बी. गायकवाड यांनी केला. त्यांनी तपासाचा भाग म्हणून जप्ती पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले व तपास पूर्ण करुन आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द निशाणी क्र.९ प्रमाणे भारतीय दंड संहितेचे कलम ३७९ व गौण खनिज कायद्याचे कलम ३ व ४ प्रमाणे दोषारोप निश्चीत केला व सदर दोषारोप मराठी भाषेत वाचून दाखविला असता आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व संपरीक्षा करण्याची विनंती केली. आरोपीविरुध्द पुरावा मिळुन आल्याने आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ अन्वये जबाब (नि. क्र.२०) नोंदविण्यात आला.

५. सहा. सरकारी अभियोक्ता श्री. बी. ई. निकम व आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. आर. डी. पावसे यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोगपक्षाचे खटल्यातील कथनांवरुन खालील मुद्दे काढण्यात आले व त्याचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष असे शाबीत करतो काय की, दिनांक २०/०२/२०२२ रोजी ६.४५ वाजेच्या सुमारास मौजे सुखापूरी येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील विनाक्रमांकाचे ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये विनापरवाना व विना रॉयल्टी मौजे रेवलगाव येथील ओढयातून चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करतांना मिळून आले ? | : नकारार्थी |
| २ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीकडे वाळू वाहून नेण्याचा अधिकृत | : नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | परवाना नसतांना सदर वाळू वाहून नेण्याचा प्रयत्न केला व त्याव्दारे गौण खनिज कायदा कलम ३ व ४ मधील तरतुदीचे उल्लंघन करून गुन्हा केला असे ? | |
| ३ | आदेश काय ? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## पटलावरील पुरावा

६. आरोपीवरील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने एकुण दोन साक्षीदार तपासले. पंच साक्षीदार क्र. १ मदन अर्जूनराव राखुंडे यांची साक्ष (नि.क्र.११) व साक्षीदार क्र.२ सूरेश बळीराम राठोड यांची साक्ष (नि.क्र.१३) वर नोंदविली. वारंवार संधी देऊनही इतर साक्षीदार पूराव्याकामी मिळून आले नाही म्हणून निशाणी क्रमांक १ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाची पुराव्याची बाजू बंद करण्यात आली.

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. १ व २ करिता :**

७. वरील मुद्दे हे एकमेकांशी सलग्न असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते चर्चेकरीता एकत्र घेण्यात आले आहेत. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने हे सिध्द करणे आवश्यक आहे की, दिनांक २०/०२/२०२३ रोजी सकाळी सुमारे ६.४५ वाजता सुखापूरी येथे एक निळ्या रंगाचे विनाक्रमांकाचे ट्रॅक्टर विना क्रमांकाची ट्रॉली ज्यामध्ये अंदाजे पाच टोपले वाळू अवैधरित्या विनापरवाना चोरटी विक्री करण्याच्या इराद्याने घेवून जात असतांना मिळून आले.

८. अभियोग पक्षाने एकूण दोन साक्षीदार तपासले. त्यापैकी पंच साक्षीदार मदन राखुंडे (नि.क्र.११) यांनी न्यायालयात दिलेल्या साक्षीत स्पष्टपणे नमूद केले की, त्यांच्या समक्ष कोणताही पंचनामा झाला नाही व त्यांना पंचनाम्याच्या मजकुराबाबत कोणतीही माहिती नाही. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास साक्षकामी सहकार्य केलेले नाही. त्यामुळे जप्ती पंचनाम्याची सत्यता व विश्वसनीयता यावर शंका निर्माण होते.

९. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ पोलीस कॉन्स्टेबल सुरेश राठोड यांची साक्ष (नि.क्र.१३) नोंदविण्यात आली. त्यांच्या पूराव्यानूसार दि.२०.०२.२०२३ रोजी सकाळी ६.०० वाजता वरीष्ठांनी दिलेल्या माहितीनूसार रेवलगाव ते सुखापूरी या मार्गावर कारवाईसाठी गेले असता तेथे त्यांना एक विना क्रमांकाचा ट्रॅक्टर वाळूने भरलेला दिसून आला. पोलीसांनी त्यास थांबण्याचा इशारा केला असता तो न थांबता जागेवर वाळू खाली करून पळून गेला. पोलीसांनी त्याचा पाठलाग करून चालकास पकडले. चालकास त्याचे नाव विचारले असता त्याने लक्ष्मण भाउसाहेब राखुंडे रा. सुखापूरी असे सांगीतले. सदर ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमधील पाच टोपले वाळू मिळून आली.

१०. सदर प्रकरणी साक्षीदार क्र.२ यांनी नमूद केल्याप्रमाणे ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये पाच टोपले वाळू मिळुन आली, या कथनाच्या सिध्दतेकामी अभियोगपक्षातर्फे कोणताही कागदोपत्री पूरावा जसे मूद्देमाल पावती किंवा वाळू पाच टोपले असल्याबद्दलचे कागदपत्रे अभिलेखावर दाखल नाही. दुसरी महत्वाची बाब म्हणजे जप्ती पंचनामा सिध्द करणेकामी तपासी अमलदार पूराव्याकामी उपलब्ध झालेले नाही. अशा परिस्थितीत, वाळूची जप्ती किंवा वाहनाची जप्ती नियमाप्रमाणे सिध्द झालेली नाही.

११. अभियोग पक्षातर्फे इतर महत्त्वाचे साक्षीदार, जसे की फिर्यादी साक्षकामी उपलब्ध झालेले नाही. असे असतांना, घटनाक्रम देखील सिध्द होत नाही. तसेच आरोपीकडे वाळू वाहतुकीसाठी परवाना नव्हता याबाबत साक्षीदार क्र.२ च्या पूराव्यात काहीही कथन नाही. अशा परिस्थिती, आरोपीच्या ताब्यात अवैधरित्या वाळूचा साठा मिळून आला याबद्दल शहानिशा झाली की नाही असा संभ्रम निर्माण होतो.

१२. एकंदरीत पूराव्याचा विचार करता, आरोपीविरुद्धचे आरोप संशयाच्या पलीकडे सिद्ध न झाल्याने आरोपी निर्दोषमुक्त होण्यास पात्र ठरतो. अशा परिस्थितीत, मुद्दा क्र.१ व २ यांचे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून, मूद्दा क्र.३ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१ आरोपी लक्ष्मण भाउसाहेब राखुंडे भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम ३७९ व गौण खनिज कायद्याचे कलम ३ व ४ प्रमाणे दंडनीय अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) च्या तरतुदी नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२ प्रस्तुत खटल्यातील जप्त मुद्देमालाचा अंतरिम ताबा दि.०८.०३.२०२३ रोजीच्या न्यायालयीन आदेशाप्रमाणे बंधपत्रावर मुळ मालकाला परत देण्यात आला होता तो आदेश कायम करण्यात येत आहे.

३ आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ नुसार दिलेले जामीनपत्रे व बंधपत्रे पुढील सहा महिने कालावधीपर्यंत कायम राहतील.

(सदर न्यायनिर्णय आरोपी समक्ष खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by
SIMA SACHIN JAIN
Date: 2026.04.05
15:09:11 +0530

दिनांकः ०२/०४/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्या.क्र.१), अंबड

प्रमाणपत्र

मी शपथेवर निवेदन करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :- एस.एम. सपकाळ
न्यायालयाचे नाव :- प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, अंबड
पी.डी.एफ.दिनांक :- ०२.०४.२०२६

स्वा/-
लघुलेखक